**प्रेस नोट.दि. ३१/०३/२०२४.**

**शहर गुन्हे शाखेकडुन चोरीचे ०३ गुन्हे उघड**

---

दि. २७/०३/२०२४ रोजी सपोनि/महाडिक व पथक असे पोलीस आयुक्तालय हददीमध्ये खाजगी वाहनांनी गस्त घालत असताना, गुप्त बातमीदाराने, एक इसम कुमार करजगी कॉम्प्लेक्स समोरील मोकळे मैदान, जुनी मिल चाळ, सोलापुर येथे मोबाईल विक्री करीता आलेला असल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने दोन पंचांना बोलावुन घेवुन बातमीदाराने दिलेल्या ठिकाणी गेले असता, सदर ठिकाणी एक इसम पाठीला काळी बॅग अडकावुन संशयितरित्या सदर ठिकाणी वावरत असताना दिसला. त्याचे जवळ पथक जात असताना तो त्यांना पाहुन पळण्याच्या तयारीत असताना, त्यास पथकाने ताब्यात घेतले.

सदर इसमास पंचासमक्ष त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव उमेश बंडु उकरंडे, वय - ४५ वर्षे, रा. मल्लीकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापुर असे असल्याचे सांगितले आहे. सदर आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ असलेल्या काळया रंगाच्या बॅगेमध्ये एक ओपो कंपनीचा मोबाईल, एक रेडमी कंपनीचा मोबाईल, आधार कार्ड, पॅनकार्ड, ONGC चे ओळखपत्र, ॲक्सिस बँकेचे डेबिट कार्ड, आयसीआयसीआय बँकेचे क्रेडीट कार्ड, एक पांढऱ्या रंगाचा Designed by Apple in California Assembled in Vietnam असा इंग्रजीत लिहीलेले इयर पॉड व ॲपल कंपनीचा मोबाईल चार्जर, एक काळया रंगाची बॅग, लॅपटॉप व लॅपटॉप चार्जर असे साहित्य मिळुन आले. त्याबाबत त्याचेकडे चौकशी केली असता, सदरचे मोबाईल व इतर साहित्य चोरी करुन आणलेबाबत कबुली दिली. त्याअनुषंगाने अभिलेख पडताळला असता, खालील गुन्हयातील मालमत्ता असल्याचे निष्पन्न झाल्याने जे जप्त करुन खालील ०३ गुन्हे उघडकिस आलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम | मालाचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | जोडभावी पेठ | गु.र.क्र. १४५/२०२४ भादविक ३८० | ११,०००/- रु. एक हिरव्या रंगाचा रेडमी कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट, त्याचा आय एम ई आय नंबर ८६८३८४०५९१३६५७१, ८६८३८४०५९१३६५८९ असा असलेला जु.वा.किं.अं. |
| २ | फौजदार चावडी | गु.र.क्र. १८८/२०२४ भादविक ३८० | ०९,०००/- रु. एक निळया रंगाचा ओपो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट, त्याचा आय एम ई आय नंबर ८६०४७४०६४३९०८५५, ८६०४७४०६४३९०८४८ असा असलेला जु.वा.किं.अं. |
| ३ | सोलापुर लोहमार्ग | गु.र.क्र. ६५/२०२४ भादविक ३७९ प्रमाणे | १) २७,०००/- रु. ॲपल कंपनीचा पांढऱ्या रंगाचा ज्यावर Designed by Apple in California Assembled in Vietnam असे लिहीलेला एअर पॉड्स प्रो, इयर फोन ज्यावर मेहंदी रंगाचा कव्हर असलेला जु.वा.किं.अं.<br>२) ००/- रु. आधार कार्ड त्यावर नंबर ६१७८ १२७८ ३२६० असा असलेला, तसेच पॅनकार्ड नंबर DODPP6533M असा असलेला<br>३) ००/- रु. ONGC चे माधुरी निवास पाटील या नावाचे ओळखपत्र<br>४) ००/- रु. ॲक्सिस बँकेचे डेबिट कार्ड नं. ४५०५ ०३०१ १५९१, ६६५१, आयसीआयसीआय बँकेचे क्रेडिट कार्ड नंबर ४३१५ ८११८ ५०३३ ९००५ असे असलेले<br>५) २०००/- रु. ॲपल कंपनीचे पांढऱ्या रंगाचे मोबाईल चार्जर त्याचा मॉडेल A2246EMC3678 असा असलेला जु.वा.किं.अं.<br>६) १०००/- एक काळया रंगाचे चार्जर ठेवण्यासाठीचे रेक्झीन पॉकिट जु.वा.किं.अं. |

अशाप्रकारे गुन्हे शाखेकडुन ०३ गुन्हे उघडकीस आले असुन, त्यामध्ये एकुण १,००,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगीरी श्री. आर. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, श्रीमती दीपाली काळे, पोलीस उप- आयुक्त (गुन्हे/विशा), श्रीमती प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडीक, पोह/अंकुश भोसले, पोना/शैलेश बुगड, पोकॉ/राजकुमार वाघमारे, पोकॉ/ अभिजीत धायगुडे यांनी केलेली आहे.

**मा. पोलीस आयुक्त सो,**
**सोलापूर शहर करीता**

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner